
खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : २६५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०७ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## पुरंदर विमानतळाचे 'टेकऑफ'! पहिल्याच दिवशी ४५० एकर जमीन ताब्यात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, पुणे :** पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली आहे. ४ मे रोजी, सोमवारपासून सुरू झालेल्या या भूसंपादन प्रक्रियेत पहिल्याच दिवशी ४५० एकर जमिनीचे करारनामे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. या संपूर्ण भूसंपदन प्रक्रियेत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जात आहे, म्हणजे First Come, First Serve तत्वावर ही प्रक्रिया राबवली जात आहे. तसेच, करारावर स्वाक्षरी झाली की लगेच पैसे मिळतील असे आश्वासन जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे.

**नवीन पॅकेज जाहीर!**

याशिवाय ५ मे रोजी, मंगळवारी पुरंदर येथील विमानतळासाठी राज्य सरकारने आणखी एक 'पॅकेज' जाहीर केलं आहे. यामध्ये शेतकऱ्यांसाठी प्रति एकरी १.६१ कोटी रुपयांचा दर निश्चित झाला आहे. याशिवाय Purandar Interanational Airport च्या शेजारी उभारण्यात येणाऱ्या AeroCity मध्ये १० टक्के भूखंड शेतकऱ्यांना परत केला जाईल. याशिवाय विमानतळामुळे बाधित झालेल्या परिवाराम धील एका सदस्याला नोकरी देण्यात येईल. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी याबद्दल माहिती दिली आहे.

पुरंदर येथील विमानतळाला शासन विशेष प्राधान्य देत असून जमीन म ालकांसाठी विशेष पॅकेज ठरवण्यात आलं आहे. सरकार जरी प्रति एकरी १.६१ कोटी रुपये देत असेल तरी इतर सुविधांचा विचार करता शेतकऱ्यांना प्रति एकरी सुमारे २ कोटींची नुकसान भरपाई नक्कीच मिळत आहे, असे डुडी यावेळी म्हणाले. या जमीन संपादनाची औपचारिक प्रक्रिया ७ मेपासून जिल्हाधिकारी कार्यालय आणि सासवड प्रभाग कार्यालयात सुरू होणार आहे. करारावर स्वाक्षरी करताच RTGS द्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत. ही संपूर्ण प्रक्रिया १० जूनपर्यंत पूर्ण करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे.

पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील ७ गावांमधील सुमारे जमिनीची गरज आहे. विमानतळासाठी १,२१६ हेक्टर आणि एरोसिटीसाठी २४५ हेक्टर जागेची आवश्यकता आहे. राज्य सरकारने गेल्या आठवड्यात शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मोबदल्याचे दर निश्चित केले. त्यानंतर पहिलं पॅकेज ठरलं आणि ४ मेपासून प्रक्रियेला सुरूवात झाली. यापूर्वीच ७ गावांमधील ४००हून अधिक कुटुंबियांनी मंजुरी देऊन आपल्या जमिनीचे कागदपत्रे सादर केले आहेत. १० जून या मुदतीपूर्वी जे शेतकरी आपली जमिन ताब्या देतील त्यांना एरोसिटीमध्या १० टक्के भूखंड मि ळणार आहे. निर्धारित वेळेनंतर सरकार स्वतःहून जमिन हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू करेल आणि त्यावेळी शेतकऱ्यांना हा लाभ घेता येणार नाही.



**पुरंदर येथील विमानतळामुळे बाधित होणारी गावं**

उदाचीवाडी येथील ५८.३४ हेक्टर जमीन, वनपुरी येथील १५४.०६ हेक्टर जमीन, कुंभारवळणातील २५४.४८ हेक्टर, खानवडी येथे २६९.२२ हेक्टर, मुंजवडी येथील ८२.५६ हेक्टर, एकहतपूरमधील १९९.०३ हेक्टर आणि पारगावातील १८८.०७ हेक्टर जमीन अधिग्रहित केली जाईल.

## मनमाड- मालेगाव रस्त्यावर टँकर-ट्रकचा भीषण अपघात; ४ जण जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मनमाड :** इंदूर-पुणे महाम ार्गावरील, मालेगाव-मनमाड-येवला म ार्गावरील अपघातांचे सत्र सुरूच असून, मंगळवारी (दि. ५) टैंकर व ट्रकची समोरासमोर धडक होऊन चारजण गंभीर जखमी झाले. हा अपघात इतका भीषण होता की अपघातग्रस्त वाहनातून अक्षरशः गाडीचे पत्रे काढून जखमींना बाहेर काढण्याची वेळ आली.

मनमाड-मालेगाव रस्त्यावरील दहेगाव शिवारात टँकर (क्र. एमएच ४१ एजी ८०४३) व युरिया घेऊन जाणाऱ्या ट्रकची समोरासमोर धडक झाली. या अपघातात चारजण गंभीर जखमी झाले. त्यांना स्थानिक नागरिकांनी अथक प्रयत्नांती अपघातग्रस्त वाहनातून बाहेर काढले. सर्व जखमींना मनमाड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.



दरम्यान, या अपघातामुळे पुन्हा एकदा मालेगाव-मनमाड-येवला मार्ग चर्चेत आला आहे.

**अति घाईमुळे घटना!**

इंदूर-पुणे महामार्गावर अवजड वाहनांची मोठी वर्दळ आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश धुडकावत अवजड वाहने सर्रास दिवसाही मार्गस्थ होत आहेत. सततच्या वाहतूक कोंडीत अडकून पडण्याची व तासनतास एका ठिकाणी थांबण्याची धास्ती असल्याने प्रत्येकाला इथून पटकन कसे बाहेर पडावे, याचे वेध लागलेले असतात. त्यामुळे वाहतूक नियमांकडे डोळेझाक होत आहे.

**महामार्गावर इंधन टँकर उलटला !**

**येवला :** नगर-मनमाड महामार्गावर तालुक्यातील गोपळवाडी फाट्यावर इंधन वाहतूक करणारा टँकर उलटला. यावेळी होणाऱ्या इंधन गळतीने परिसरात मोठी धावपळ उडाली. दरम्यान, महामार्ग पोलिस व तालुका पोलिसांनी तातडीने या महामार्गावरील वाहतूक बंद केली. चालकाचे नियंत्रण सुटल्याने टँकर रस्त्याच्या कडेला जाऊन उलटल्याचे सांगितले जाते. मंगळवारी, (दि.५) दुपारी १ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. अपघातग्रस्त टँकरमधून मोठ्या प्रमाणावर इंधन गळती सुरू झाल्याने घटनास्थळी मनमाड येथून गळती थांबणाऱ्या पथकास पाचारण करण्यात आले होते, तर तालुका पोलिस निरीक्षक संदीप मंडलिक, महामार्ग पोलिस शिपाई संदीप दराडे, योगेश वायबसे आदी घटनास्थळी थांबून होते.

## नागपूर सायबर पोलिस ठाण्यातील दोन पीआयसह ९ कर्मचारी निलंबित

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नागपूर :** ५०० रुपयांचा गुन्हा दाखल करून वसुली करण्याचा ठपका ठेवत सायबर पोलिस ठाण्यातील दोन पीआयसह नऊ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले.

उत्तर प्रभागाचे निरीक्षक बळीराम सुतार, दक्षिण प्रभागाचे निरीक्षक योगेश घारे, साहाय्यक पोलिस निरीक्षक विजय राणे, पोलिस शिपाई प्रफुल्ल ठाकरे, सतीश वाघ, श्रीकांत गोणेकर, सुशील चंगोले, अजय पवार व सौरभहिवरकर, अशी निलंबित केल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आहेत. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी केलेल्या या निलंबनाच्या कारवाईमुळे पोलिस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, दीड महिन्यांपूर्वी सायबर पोलिसांनी ऑनलाइन क्रिकेट सट्ट्यात ५०० रुपयांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. यात पुण्यातील सट्टेबाज जैन याचे नाव नव्हते. परंतु, त्याच्याकडून वसुलीसाठी हा गुन्हा




दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर सायबर साय पोलिसांचे पथक पथक पुण्याला गेले. खराडी येथील जैनच्या कार्यालयावर छापामार कारवाई केली.

अटक न करण्यासाठी या पथकाने जैन याच्याकडून मोठ्या प्रमाणात रक्कम उकळली. याच गुन्ह्याच्या तपासासाठी दुसरे पथक मुंबईला गेले. कारवाई न करताच या पथकाला परत बोलावण्यात आले. मुंबई व पुण्यात जाण्यासाठी दोन्ही पथकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेतली नाही अथवा स्टेशन डायरीतही तशी नोंद केली नाही. दोन्ही पथके नागपुरात परतल्यानंतर वसुलीची बाब समोर आली.

**वाटण्यांचा वाद अन् साराच बोभाटा !**

एपीआय राणे यांनी शिपाई प्रफुल्ल ठाकरे यांच्यावर माहिती उघड केल्याचा आरोप केला. ठाकरे यांना मारहाण केली. त्यामुळे ठाकरे दोन दिवस शहरातून गायब झाले. अचानक ठाकरे बेपत्ता झाल्याने हे वसुलीचे संपूर्ण प्रकरणच बाहेर आले. पोलिस आयुक्तांनी पोलिस उपायुक्त नित्यानंद झा यांना चौकशीचे आदेश दिले. चौकशीत घारे, राणेंसह नऊ जण दोषी असल्याचे आढळले. त्यानंतर आयुक्तांनी त्यांना निलंबित केले. या नऊ जणांव्यतिरिक्तही काही वसुली-वसुलीबाज सायबरमध्ये असल्याची चर्चाही या निमित्ताने विभागात सुरू झाली आहे.

**दीपक अग्रवाल नवे उपायुक्त**

पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी मंगळवारी तडकाफडकी सायबरच्या उपायुक्तपदी पोलिस मुख्यालयाचे उपायुक्त दीपक अग्रवाल यांची नियुक्ती केली. ५०० रुपयांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल करून वसुली प्रकरणाने सायबर विभाग चांगलाच चर्चे त आला. आयुक्तांनी कर्मचाऱ्यांच्या निलंबनाच्या कारवाईनंतर मंगळवारी अग्रवाल यांच्याकडे सायबरचा अतिरिक्त कारभार सोपविला. आधी उत्तर सायबरचे ऋषिकेश रेड्डी तर दक्षिण सायबरचे लोहित मतानी हे उपायुक्त होते. आता अग्रवालच सायबरचे उपायुक्त असतील.

## 'तुम्ही कामाला गेल्यावर तात्या मला ओढून न्यायचे' पुण्यातील पर्वती प्रकरणातील चिमुकलीने आई-वडिलांना सांगितली आपबिती

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०६, पुणे :** पुण्यामधील भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये झालेल्या संतापजनक घटनेला काही दिवसही उलटत नाही, तोवर शहरातील पर्वती भागात घडलेल्या धक्कादायक प्रकरणानं सगळ्यांनाच हादरवून टाकलं आहे. आई-वडील कामावर जाणारे, घरात एकटी राहणारी चिमुकली मुलगी आणि याचाच गैरफायदा घेत स्वत:च्याच नराधम आजोबाने तिच्यावर जबरदस्ती केल्याचा प्रयत्न केल्याचं समोर आलं आहे. याप्रकरणी आरोपी आजोबाला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे. याचदरम्यान, पीडित चिमुकलीच्या आई-वडिलांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना या घटनेबाबत एक मोठा खुलासा केला आहे.

**● चिमुरडीने सांगितला घडलेला प्रकार**

घटनेच्या दिवशी आई नेहमीप्रमाणे कपड्यांच्या दुकानात कामाला गेली होती, तर वडील रिक्षा चालवण्यासाठी बाहेर होते. संध्याकाळी घरात मुलगी एकटीच होती. रात्री साधारण ९ वाजता आई घरी आली, तेव्हा मुलगी खूप घाबरलेली दिसली. रडत-रडत तिने आईला सांगितलं, 'तुम्ही कामाला गेल्यावर तात्या मला ओढून नेत होते. माझे कपडे काढले. अंगावर नखं मारली', हे ऐकून आईच्या पायाखालची जमीनच सरकली. आईने सांगितलं की, 'मुलीच्या अंगावर खरचटल्याच्या खुणा होत्या आणि ती पूर्ण घाबरलेली होती. तेव्हा हा सगळा प्रकार लक्षात आला.

**● याआधीही घडला होता असा प्रसंग**

धक्कादायक म्हणजे, मुलीने यापूर्वीही असाच प्रकार झाल्याचं सांगितलं. 'आधी पण तात्या असंच करत होते. पण मी पळून जायचे', असं चिमुरडीने तिच्या आई-वडिलांना बोलताना सांगितलं, आणि भीतीमुळे ती आतापर्यंत काहीच बोलली नव्हती. वडिलांनी सांगितलं की, 'मी रिक्षाचालक आहे. त्यावेळी मी बाहेर होतो. वर्षभरापूर्वीही आरोपीने घरातून मोबाईल चोरी केला म्हणून मी त्याला घरातून हाकललं होतं. तो जवळच राहत होता, हे आम्हाला माहीत नव्हतं.' आरोपीने मुलीला खाऊ देऊन तिचा विश्वास जिंकला आणि घरात कोणी नसताना हा प्रकार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**● फाशी झालीच पाहिजे!**

या घटनेनंतर आई-वडिलांचा संताप अनावर झाला आहे. 'माझ्या मुलीच्या अंगाला हात लावणाऱ्याला सोडू नका. त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे,' अशी त्यांची ठाम मागणी आहे. पोलिसांनी या प्रकरणात तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा बालसुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे. घरात ओळखीच्यांकडूनच धोका निर्माण होत असेल, तर मुलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

## मी बायकोचा खून केला पतीकडून पत्नीची निर्घृण हत्या...

**अक्षराज : रहीम कोक्कर**



**दि.०६, जिंतूर :** परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे बुधवारी पहाटे घडलेल्या एका अत्यंत धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. कौटुंबिक वादातून पतीने आपल्या पत्नीची निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली असून, आरोपीने स्वतः पोलिस ठाण्यात जाऊन गुन्ह्याची कबुली दिल्याने या प्रकरणाला अधिकच नाट्यमय वळण मिळाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी श्रीधर गायकवाड याने पहाटे सुमारे साडेपाच वाजण्याच्या सुमारास पत्नी सुमित्रा हिला दुचाकीवर बसवून जिंतूर-जालना महामार्गालगत असलेल्या आपल्या शेतातील आखाड्यावर नेले. सुरुवातीला दोघांमध्ये वाद झाल्याचे समजते. त्यानंतर संतापाच्या भरात आरोपीने प्रथम काठीने तिच्यावर जबर मारहाण केली.

मात्र, एवढ्यावरच न थांबता त्याने क्रूरतेची परिसीमा गाठत मोठा दगड तिच्या डोक्यात घालून जागीच तिचा खून केला.या घटनेत मृत झालेल्या महिलेचे नाव सुमित्रा श्रीधर गायकवाड (वय ३८) असे असून, तिच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सकाळी ही घटना समोर येताच परिसरात भीतीचे आणि खळबळीचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात असून, अशा प्रकारच्या घटनांमुळे समाजात असुरक्षिततेची भावना वाढत असल्याचेही बोलले जात आहे.

दरम्यान, खून केल्यानंतर आरोपी श्रीधर गायकवाड थेट पोलिस ठाण्यात गेला आणि मी बायकोचा खून केला अशी कबुली दिल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे. या कबुलीनंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, नेमके कारण काय होते, पूर्वीपासून कौटुंबिक वाद होते का, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत. या हत्येमागील नेमके कारण तपासाअंती स्पष्ट होणार असले तरी, या घटनेने जिंतूर तालुक्यात एकच खळबळ उडवली आहे.

अशा प्रकारच्या वाढत्या कौटुंबिक गुन्ह्यांमुळे समाजात चिंता व्यक्त केली जात असून, पोलिसांनी नागरिकांना संयम बाळगण्याचे व वाद टोकाला जाऊ न देण्याचे आवाहन केले आहे.




## इराणच्या अणुक्षमतेचा स्त्रोत

इस्रायल आणि अमेरिका यांच्या नेतृत्वाखालील संघर्षाने इराणविरुद्ध वाढत चाललेला तणाव अमेरिकेच्या परिप्रेक्ष्यामधून एकाच मुद्द्याभोवती फिरतो आहे, तो म्हणजे इराणची कथित अण्वस्त्र महत्त्वाकांक्षा. युरेनियम समृद्धीकरण, क्षेपणास्त्र क्षमता, प्रादेशिक सुरक्षेचे समीकरण – या सर्वांवरील तज्ज्ञांची मते सातत्याने समोर येत आहेत. मात्र या सर्व चर्चांमध्ये जग एक कळीचा मुद्दा मात्र पद्धतशीरपणे विसरले आहे, जर इराणकडे अणुक्षमता असेल, तर ती त्याला मिळाली कशी? आधुनिक अणुक्षमता ही एकाकीपणे निर्माण होत नाही. त्यासाठी उच्च दर्जाचे वैज्ञानिक ज्ञान, संवेदनशील तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि औपचारिक किंवा अनौपचारिक आंतरराष्ट्रीय नेटवर्कची आवश्यकता असते. इराणचा अणुप्रवास हा एका देशाच्या मर्यादित प्रयत्नांचा परिणाम नसून अनेक दशकांतील जागतिक परस्परसंवादातून घडलेली प्रक्रिया आहे. मग जग परिणामांवर चर्चा करत आहे, पण कारणांकडे दुर्लक्ष का करत आहे ? या बाबतचा इतिहास पाहणे गरजेचे आहे. १९६७ मध्ये इराणला अमेरिकेकडून पहिला संशोधन रिॲक्टर मिळाला. १९७९च्या इराणमधील क्रांतीने मित्रत्वाची समीकरणे बदलली आणि २०१५च्या ऐतिहासिक अणुकरारामधून इराणच्या अणुकार्यक्रमावर मर्यादा आणण्याचा प्रयत्न झाला. या सर्व घटनाक्रमाकडे पाहिल्यास लक्षात येते की, इराणचा अणुप्रवास हा वस्तुतः अमेरिकेनेच सुरू केला होता. आज हा केवळ तंत्रज्ञानाचा विषय नसून तो बदलत्या जागतिक युतींचा आणि तुटलेल्या करारांचा इतिहास आहे. जेव्हा इराण अणुक्षमता विकसित करत होता, तेव्हा ही विकसित राष्ट्रे काय करत होती? इराणचा अणुकार्यक्रम लपूनछपून चालणारा नव्हता. नागरी अणुऊर्जा प्रकल्प, संशोधन केंद्रे, तांत्रिक सहकार्य या सर्व घडामोडी दशकानुदशके जगासमोरच होत होत्या. त्या काळात आंतरराष्ट्रीय संस्था, करार व्यवस्था आणि प्रमुख शक्ती यांना याची पूर्ण कल्पना होती. तरीही, त्यावेळी ना तीव्र विरोध झाला, ना निर्णायक हस्तक्षेप. मग आजच हा प्रश्न इतक्या तीव्रतेने का उभा राहतो? यातील सर्वांत मोठा विरोधाभास म्हणजे इराणच्या अणुकार्यक्रमाची पायाभरणीच पाश्चिमात्य मदतीतून झाली होती. 'ॲटम्स फॉर पीस' या उपक्रमांतर्गत अमेरिकेचेच माजी अध्यक्ष आयसेनहॉवर यांच्या नेतृत्वाखाली इराणला अणुसंशोधनासाठी मदत देण्यात आली. पुढे विविध युरोपीय आणि इतर देशांनी नागरी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली, तांत्रिक मदत दिली आणि पायाभूत सुविधा उभारण्यात सहभाग घेतला. म्हणजेच, आज ज्या क्षमतेकडे संशयाने पाहिले जाते, त्याच क्षमतेची बीजे जागतिक शक्तींनीच पेरली होती. इराणच्या अणुकार्यक्रमाचा गुंता समजून घेण्यासाठी 'अणुइंधन चक्र' प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. मुळात, खाणीतून काढलेल्या नैसर्गिक युरेनियमवर प्रक्रिया करून त्याचे 'समृद्धीकरण' केले जाते. जेव्हा हे समृद्धीकरण ३ टक्के ते ५ टक्क्यांपर्यंत असते, तेव्हा त्याचा वापर वीज निर्मितीसाठी होतो. मात्र, जेव्हा हेच प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा जास्त वाढवले जाते, तेव्हा त्यातून अण्वस्त्रे बनवणे शक्य होते. तंत्रज्ञानाच्या या प्रवासात वीज निर्मिती आणि अण्वस्त्रे निर्मिती यांच्यातील सीमारेषा अतिशय पुसट असते. अणुप्रसारावर चर्चा करताना पाकिस्तानचे वैज्ञानिक ए. क्यू. खान यांच्या नेटवर्कचा उल्लेख टाळता येत नाही. खान नेटवर्कने इराणसह अनेक देशांना अणुतंत्रज्ञान पुरवल्याचे आंतरराष्ट्रीय चौकशीत उघड झाले आहे. सेंट्रीफ्युज डिझाइन्स आणि तांत्रिक ज्ञान गुप्त मार्गाने हस्तांतरित करण्यात आले, मग त्यावेळी अमेरिका गप्प का बसली?

अमेरिकेने इराणवरील निर्बंध कडक केल्यानंतर, रशियाने बुशहर अणुऊर्जा प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात तांत्रिक सहकार्य दिले, तर चीनने युरेनियम उत्खनन आणि प्रक्रिया क्षेत्रात इराणला महत्त्वपूर्ण मदत केली. हे सहकार्य केवळ आर्थिक नसून जागतिक राजकारणात अमेरिकेच्या वर्चस्वाला शह देण्याचे एक धोरणात्मक पाऊल होते, ज्यामुळे इराणची अणुक्षमता अधिक विस्तारत गेली. अणुइंधनाचे तंत्रज्ञान आणि युरेनियम प्रक्रियेसाठी चीनने सुरुवातीच्या काळात मदत केली. ७० च्या दशकात इराणच्या 'युरोडिफ' या युरेनियम समृद्धीकरण प्रकल्पात फ्रान्सचीदेखील मोठी भागीदारी होती, सुरुवातीला बुशहर प्रकल्पाचे काम जर्मनीच्या सीमेन्स कंपनीने सुरू केले होते. एकूण काय, तर अमेरिका, युरोपियन देश अणि चीन–रशिया द्वयीने इराणला इथपर्यंत आणून ठेवले आहे. त्या काळात इराण हा पाश्चिमात्यांचा धोरणात्मक सहयोगी देश होता. पण आज परिस्थिती पूर्णपणे पालटली आहे – काल ज्याला मित्र म्हणून खांद्यावर घेतले तो मित्र आजचा धोका बनला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे आंतरराष्ट्रीय करार आणि देखरेख व्यवस्था. इराण हा या कराराचा भाग आहे. या कराराचा उद्देश अण्वस्त्र प्रसार रोखणे, शांततापूर्ण अणुऊर्जेचा वापर प्रोत्साहित करणे हा आहे. या कराराची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याची जबाबदारी आयएईए या संस्थेवर आहे. ही आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था विविध देशांच्या अणुकार्यक्रमांची तपासणी करते, नियमांचे पालन होत आहे का हे पाहते आणि अणुसाहित्याचा गैरवापर रोखण्याचा प्रयत्न करते; परंतु इराणच्या बाबतीत आयएईएची भूमिका संशयास्पद राहिली आहे.


**– राजीव शाह**

# रिल्सची आभासी दुनिया !

सध्याचे युग हे स्मार्ट फोन आणि इंटरनेटचे युग आहे. हातात स्मार्ट फोन नाही असा तरुण आज शोधूनही सापडणार नाही. इंटरनेटचा डाटा पॅकही परवडणारा असल्याने प्रतिदिन २ जीबी मिळणारा डाटा आजचा तरुण कामासाठी कमी आणि मनोरंजनासाठीच अधिक व्यय करताना दिसतो. ऑनलाईन गेम्स खेळण्यासोबतच आजच्या पिढीला वेड लागले आहे ते रिल्स पाहण्याचे. आजमितीला इंस्टाग्राम आणि युट्युबवर विविध विषयावरील कोट्यवधी रिल्सचे भांडार उपलब्ध आहे.

विविध शासकीय योजनांची माहिती देणारे, तांत्रिक युक्त्या शिकवणारे, नवनवीन पदार्थांच्या रेसिपी सांगणारे, फिल्मी जगताची माहिती देणारे,क्रीडा क्षेत्रातील निवडक आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग दाखवणारे, प्रतिष्ठित व्यक्तींच्या खासगी आयुष्यातील घडामोडींची माहिती देणारे, नृत्याचे प्रशिक्षण देणारे, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय स्तरावरील घडामोडी टिपणारे, मधुचंद्राला कुठे जावे इथपासून तर कुटुंबासह सुट्टी साजरी करण्यास जाण्यासाठी विविध पर्यटन स्थळांची आणि धार्मिक स्थळांची माहिती देणारे, लाखो रिल्स आज सहज उपलब्ध आहेत. यासोबतच चित्रपटातील एखाद्या गाण्यातील हुक स्टेपवर थिरकणारे तरुण तरुणींचे रिल्स, मालिका आणि चित्रपटांतील विनोदी प्रसंगांचे रिल्सही पुष्कळ प्रमाणात उपलब्ध आहेत. खास प्रौढांसाठी तयार करण्यात आलेले रिल्सही आज वयाची कोणतीच अट न बाळगता सहजपणे सर्वांना पाहता येतात. अशा रिल्समध्ये शिव्यांचा आणि अश्लील शब्दांचा मुक्तपणे वापर तर असतोच शिवाय अशा रिल्स बनवणाऱ्या तरुणी अंगप्रदर्शन करून रिल्सवर प्रतिदिन लाखो लाईक्स कमावत असतात. मनोरंजनासाठी तयार करण्यात आलेल्या, विनोदी मसाला असलेल्या, द्विअर्थी संवादांचा भरणा असलेल्या आणि अश्लील कंटेंट असलेल्या रिल्स पाहण्यात आजचा तरुण अधिक रुची दाखवत असल्याने अशा प्रकारच्या रिल्स बनवणाऱ्या युट्युबर्सची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ठराविक सबस्क्राइबर झाल्यावर, रिल्सना ठराविक लाईक्स आणि शेअर्स मिळाल्यावर ते बनवणाऱ्यांना आर्थिक कमाईसुद्धा होत असल्याने रिल्स बनवणाऱ्यांची संख्या आज वारेमाप वाढली आहे. काहींना तर रिल्स बनवण्याचे जणू व्यसनच लागले आहे. शहरासारख्या ठिकाणी रेल्वे स्थानक असो वा बस स्टॅन्ड, भाजी मंडई असो वा शॉपिंग मॉल सर्वत्रच तरुण मुलामुलींची टोळी रिल्स बनवताना कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यात दिसून येते.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनी, विवाहित तरुणी विविध गाण्यांवर अंगविक्षेप करत रिल्स बनवतात आणि त्या इंस्टाग्राम आणि युट्युबवर अपलोड करतात. अशा रिल्सवर येणाऱ्या आंबट शौकिनांच्या कमेंट्स




वाचून या तरुणींच्या आई वडिलांना, जवळच्या जिवाभावाच्या नातेवाईकांना काय वाटत असेल, याचा विचार या तरुणी करणार आहेत का ? रिल्स बनवण्याच्या आहारी गेलेला मोठा वर्ग आज समाजात पाहायला मिळतो आहे. अशा तरुण–तरुणींना रिल्स बनवताना आपण कुठे वावरत आहोत, आजुबाजुने जाणारे लोक आपल्याकडे पाहून काय विचार करत असतील, त्यांपैकी आपल्या कोणी परिचयाचे किंवा नातेमंडळीतील आहेत का याचे जराही भान नसते किंबहुना त्याची त्यांना पर्वाही नसते. रिल्सच्या आहारी गेलेल्या या मंडळींना आपला हा नाद आपल्याला वास्तव जगतापासून दूर घेऊन जात आहे याचे जराही भान नसते.


युट्युबवर रिल्स आणि व्हिडीओ बनवून लक्षावधी फॉलोअर्स आणि युजर्स गोळा केलेले अनेक युट्युबर्स आज युट्युबकडून प्रतिमास लाखो रुपये वेतन घेत आहेत. यापैकी कितीतरी जण साधे सातवीची परीक्षाही उत्तीर्ण झालेले नाहीत. सध्याच्या युगात यशस्वी व्हायचे असेल, प्रसिद्धी मिळवायची असेल आणि पैसा कमवायचा असेल, तर त्यासाठी शिक्षण अनिवार्य नसून लोकांना आवडतील अशा रिल्स बनवता आले पाहिजे असा चुकीचा संदेश आजच्या तरुण पिढीवर बिंबु लागला आहे. आई बाबांनी ज्यांची कधी नावेही कुठे ऐकली अथवा वाचली नाहीत असे युट्यूबर्स आजच्या पिढीच्या गळ्यातील ताईत बनू लागले आहेत. त्यामुळे शालेय जीवनापासूनच विद्यार्थी रिल्स बनवून ते अपलोड करू लागले आहेत. रिल्समध्ये सायकल्सवर , बाईक्सवर केलेले स्टंट पाहून ते स्वतः करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत आणि त्या नादात स्वतःचे हातपाय तोडून घेऊ लागले आहेत. तरुणांकडून पैसे उकलण्याचा उद्देशाने तयार केलेल्या अश्लील रिल्सच्या नदी लागून अनेक तरुण आज आर्थिक फसवणुकीला बळी पडू लागले आहेत. केवळ तरुण वर्गालाच नव्हे, तर शालेय विद्यार्थ्यांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनाच आज रिल्स पाहण्याचे वेड लागले आहे. रिल्स पाहण्यात तासन तास कसे निघून जातात याचा पत्ताही लागत नाही. आपणा सर्वांना प्रतिदिन खरोखरच मनोरंजनाची एव्हढी आवश्यकता आहे का ? मनोरंजनाच्या नादात आपला कितीतरी बहुमुल्य वेळ आपण असाच वाया घालवत असतो. विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे आज सुखाची अनेक साधने आपल्या पायाशी लोळण घेत आहेत मात्र या सर्वांचा उपभोग घेत असताना आपण अनेक शारीरिक–मानसिक विकारांना आणि दोषांना निमंत्रण देत आहोत, स्वतःची हानी करून घेत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ?

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## दोन राष्ट्रगीतांचे जनक ; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ मे, भारत मातेचे महान सुपूत्र, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर – सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले.

त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये



कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली.

१९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत.

दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते.

छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# लेकीसाठी बापाला बापच व्हावं लागतं...

बाप हा नेहमीच बाप असतो' ही म्हण वडिलांचे घरातील स्थान, त्याग आणि आधारस्तंभ असण्याचे महत्त्व अधोरेखित करते।

बाप वरून जरी कठोर वाटत असला तरी आतून मायेचा झरा असतो, जो मुलांच्या सुखासाठी स्वतःची स्वप्ने आणि इच्छा मारून आयुष्यभर कष्ट करतो.

घराची ढाल, शिस्त, कर्तव्य आणि संकटात पाठीशी उभा राहणारा तो 'आधार' असतो.

कुटुंबाच्या सुखासाठी रात्रंदिवस राबणारा, संकटकाळी वटवृक्षासारखा ठाम उभा राहणारा बाप असतो. निःस्वार्थी प्रेम: आपल्या मुलांच्या यशासाठी, त्यांना आनंदी ठेवण्यासाठी स्वतःचे आयुष्य वेचणारा बाप असतो. शिक्षक व मार्गदर्शक: आयुष्याच्या खडतर वाटेवर बोटाला धरून चालायला शिकवणारा आणि शिस्त लावणारा बाप असतो.

**त्यागाची मूर्ती :** मुलांच्या आनंदासाठी स्वतःच्या इच्छा मनात मारणारा आणि कष्टाचे जीवन जगणारा बाप असतो. बाप हा आईप्रमाणे व्यक्त जरी होत नसला तरी, मुलांच्या सुरक्षेसाठी आणि भविष्यासाठी तो नेहमीच तत्पर असतो. म्हणूनच तर बाप कशाला म्हणतात ?

हे कळण्यासाठी देखील अगोदर स्वतःला बापच व्हावे लागते.

संत शिरोमणी जगद्गुरु तुकाराम महाराज हे सदेह वैकुंठाला गेले, ही आख्यायिका महाराष्ट्रात सर्वश्रुत आहे. मात्र, ते सुद्धा आपल्या लेकीसाठी (भागीरथी) पुन्हा परत आले होते,

ही कथा वारकरी संप्रदायातील श्रद्धेचा भाग आहे.

**या संदर्भातील काही महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमणे आहेत :**

**लेकीसाठी परतणे :** तुकाराम महाराज वैकुंठाला गेल्यानंतर त्यांची मुलगी भागीरथी हिने



वडिलांचा धावा केला. अशा आख्यायिका आहेत की, तिच्यासाठी तुकाराम महाराज पुन्हा पृथ्वीवर आले होते.

**आशीर्वाद :** भागिरथीच्या विनवणीनंतर तुकाराम महाराजांनी तिच्या डोक्यावरून हात फिरवून तिला सुखी राहण्याचा आशीर्वाद दिला आणि तू तुकाराम महाराजांची मुलगी आहेस, हे विसरू नकोस, असे सांगितले.

थोडक्यात काय तर बाप हा नेहमीच बापच असतो.

याची प्रचिती काल देखील प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या रूपाने संगमनेरच्या गुंजाळवाडीत अनुभवायला मिळाली.

याचं कारण म्हणजे समाज प्रबोधनकार इंदुरीकर महाराजांची लेक चि.सौ.का. ज्ञानेश्वरी हिचा विवाह ३ मे रोजी मोठ्या थाटामाटात पार पडला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी येथे हा भव्य विवाहसोहळा पार पडला. इंदोरीकर महाराजांचं कुटुंब आणि चिलप कुटुंबीय या सोहळ्यासाठी अत्यंत उत्साही होते. लग्नाची चर्चा आधीपासूनच रंगली होती, आणि आता या सोहळ्यातील काही खास क्षण समोर येत आहेत.

दरम्यान या विवाह सोहळ्यासाठी तब्बल १०० एकर परिसरात भव्य व्यवस्था करण्यात आली होती. राज्यातील अनेक मान्यवर, राजकीय नेते आणि प्रतिष्ठित व्यक्तींना खास निमंत्रण देण्यात आलं होतं. पाहुण्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी इंदोरीकर महाराज स्वतः सर्व व्यवस्था पाहत होते. त्यांच्या लेकीचा विवाह शाही थाटात पार पडल्याचं चित्र स्पष्टपणे दिसून आलं. कीर्तनातून साधेपणाचा संदेश देणारे इंदोरीकर महाराज यांच्यावर याआधीही साखरपुड्याच्या वेळी टीका झाली होती. लग्न साधेपणाने करा, खर्च टाळा, असा संदेश देणाऱ्या महाराजांनी स्वतःच्या मुलीचं लग्न मात्र मोठ्या थाटात केल्याने पुन्हा चर्चा रंगली आहे. मात्र, टीकाकारांकडे दुर्लक्ष करत त्यांनी हा सोहळा आणखी भव्य करण्याचा निर्धार केला होता.

लग्नाआधी झालेल्या हळदी समारंभातील एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये इंदोरीकर महाराज हे कीर्तनकार म्हणून नव्हे, तर एक प्रेमळ वडील म्हणून दिसून येतात. हा क्षण पाहून अनेकजण भावूक झाले आहेत.

व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये ज्ञानेश्वरीच्या हळदीनंतरच्या जेवणावेळी इंदोरीकर महाराज स्वतः पंगतीत उपस्थितांना आग्रहाने वाढताना दिसत आहेत. पांढरा शर्ट, पँट आणि डोक्यावर टोपी अशा साध्या वेशात ते पाहुण्यांची सेवा करत होते. प्रत्येक पाहुण्याला आदराने वाढणं, त्यांची काळजी घेणं. या त्यांच्या वागणुकीतून एक वडिलांचं प्रेम स्पष्ट दिसत होतं. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. अनेकांनी या व्हिडिओवर प्रतिक्रिया देत इंदोरीकर महाराजांच्या या रूपाचं तोंडभरून कौतुक देखील केलं आहे. बाप–लेकीच्या या भावनिक नात्याबद्दल भावना व्यक्त करत नेटकऱ्यांनी देखील आपल्या कमेंट मध्ये बापाची महती सांगताना बाप हा नेहमी बापच असतो तथा आपल्या लेकीसाठी प्रत्येक बापाला प्रसंगी बापच व्हावं लागतं अशा हृदयस्पर्शी शब्दात भावना व्यक्त करून लेकीच्या बापाचं स्थान किती महत्वाचं असतं याची सर्वानाच जाणीव करून दिली आहे.

**– संजय पंडित**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## आदिवासी आश्रम शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी शहापूरमध्ये राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, ठाणे :** राज्यातील शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता वाढविणे आणि त्यातील अडचणींवर मात करण्यासाठी गुरुवार, दि.०७ मे २०२६ रोजी, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील अघई येथे एका भव्य एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. आदिवासी विकास मंत्री यांच्या संकल्पनेतून होणारी ही कार्यशाळा 'आत्मा मालिक शैक्षणिक संकुल' येथे पार पडणार असून यावेळी स्वतः आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांच्यासह सचिव दिनेश वाघमारे, आयुक्त लीना बनसोड, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे आदिवासी विकास अपर विकास आयुक्त गोपीचंद कदम, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी दिवाकर काळपांडे यांच्यासह इतरही मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८:३० वाजता नोंदणी आणि चहा-नाष्ट्याने होईल. त्यानंतर, विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता वाढविण्यासाठी प्रकल्प अधिकारी, शहापूर यांनी तयार केलेल्या विशेष प्रचार प्रसिद्धी वाहनाचे उद्घाटन करण्यात येईल. या कार्यशाळेत केवळ नियोजनावरच चर्चा होणार नाही, तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविलेल्या आणि परदेशी विद्यापीठात प्रवेश मिळविलेल्या गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा विशेष गौरवही केला जाणार आहे.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'Shaping Futures : A journey of tribal development in Palghar' या कॉफी टेबल बुकलेटचे अनावरण आणि शाळा प्रवेशोत्सवासाठीच्या 'जिंगल'चे लोकार्पण. जव्हार प्रकल्प कार्यालयाच्या 'बेंगलोर भेट' या नाविन्यपूर्ण योजनेची माहिती चित्रफीतही यावेळी दाखविण्यात येईल.

दुपारच्या सत्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत (NEP) सखोल मार्गदर्शन केले जाणार असून, नाशिक आणि ठाणे विभागाचे वरिष्ठ अधिकारी आश्रमशाळांमधील सोयी-सुविधा, विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षितता आणि गुणवत्ता वाढीचा आराखडा सादर करतील. या कार्यशाळेत विविध प्रकल्पांचे मुख्याध्यापक, गृहपाल आणि अधीक्षक यांच्याशी थेट संवाद साधला जाणार असून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता होईल, अशी माहिती आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी दिवाकर काळपांडे यांनी दिली आहे.

## जिंतूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मिनीनाथ दंडवते यांचा सत्कार



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०६, जिंतूर (परभणी) :** जिंतूर नगरपालिकेचे नवनियुक्त मुख्याधिकारी मिनीनाथ दंडवते यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या स्वागतासाठी नगरपालिकेत सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी नगरपालिकेच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी दंडवते यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिंतूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष टिका खान पठाण नियोजन सभापती गोपाळ रोकडे, बांधकाम विभाग सभापती प्रदीप चौधरी, नगरसेवक शेख अथर, मजहर भाई, जब्बार भाई तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी एकमताने दंडवते यांच्या नेतृत्वाखाली शहराच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. मख्याधिकारी मिनीनाथ दंडवते यांनी सत्काराबद्दल आभार व्यक्त करताना सांगितले की, शहरातील प्रलंबित कामे मार्गी लावणे, नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि स्वच्छ, सुबक जिंतूर घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. जिंतूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून काम केले जाईल. शहरातील मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि विकासकामांना प्राधान्य दिले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाला नगरपालिकेतील कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांची ही उपस्थिती होती. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## खाजगी नौकरी इच्छुकांसाठी सुवर्णसंधी; १२ मे रोजी बुलढाण्यात रोजगार मेळावा




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, बुलढाणा :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती तसेच STEP अंतर्गत अल्प मुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.हा रोजगार मेळावा दि.१२ मे २०२६ रोजी, मंगळवारी सकाळी ९.३० वाजता श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, पाळणा घर, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे.

सदर मेळाव्यात वैभव एंटरप्रायजेस अंतर्गत अंकित पल्प मानसार, विशल्य प्रिंमन नागपूर, संविजय इन्फ्रास्टक्चर बुटीबोरी, अपेक्स क्नीव्स नागपूर, असरोफॅब मशिनरीज नागपूर तसेच विराज प्रोफाइल मुंबई आदी नामांकित उद्योग समूह सहभागी होणार असून त्यांनी विविध रिक्त पदांची अधिसूचना दिली आहे. या रोजगार मेळाव्यात नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेणार असून प्राथमिक निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. तसेच काही उमेदवारांना प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षणाची संधीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.१० वी, १२ वी, आयटीआय, पदवीधर तसेच डढएइ्र अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेले पुरुष व महिला उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदांसाठी मुलाखत देण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा कार्यालयाशी दूरध्वनी क्रमांक (०७२६२) २४२३४२ वर संपर्क साधावा.

## ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात 'पीसीओडी क्लिनिक'चा शुभारंभ




### महिलांच्या आरोग्य सुदृढतेसाठी पुढाकार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, ठाणे :** राज्यातील महिलांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी आणि विशेषतः शहरी भागातील अविवाहित तरुणी व प्रजनन कालावधीतील महिलांमध्ये वाढणाऱ्या 'पीसीओडी' (PCOD) या हार्मोनल समस्येवर वेळीच उपचार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत आज राज्यभर पीसीओडी क्लिनिक सुरू करण्यात आले आहेत. याच अभियानाचा भाग म्हणून बुधवार, दि.०६ मे २०२६ रोजी, जिल्हा रुग्णालय ठाणे येथे जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली 'पीसीओडी क्लिनिक' चे उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटन प्रसंगी माननीय अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक (ACS) आणि माननीय निवासी वैद्यकीय अधिकारी बाह्य संपर्क (RMO-OR) यांनी लिंव संदर्भात महत्वाचे मार्गदर्शन केले. त्यांच्यासह रुग्णालयातील तज्ज्ञ स्त्रीरोग तज्ज्ञ (Gynaecologist) आणि अधिसेविकाम यांनी उपस्थित महिला व रुग्णांना पीसीओडी संदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

क्लिनिकचे स्वरूप आणि उपलब्ध सेवा : हे पीसीओडी क्लिनिक आता जिल्हा रुग्णालयात दर बुधवारी 'मेनोपॉज ओपीडी' (Menopause OP¦) सोबत नियमितपणे सुरू राहणार आहे. या क्लिनिकमध्ये महिलांना खालील सेवा पुरवल्या जाणार आहेत.

तज्ज्ञ स्त्रीरोग तज्ज्ञांकडून आरोग्य तपासणी. हार्मोनल बदलांवर आधारित आवश्यक वैद्यकीय चाचण्या. एकात्मिक पद्धतीचा (Integrated Approach) औषधोपचार. आरोग्यविषयक आणि मानसिक समुपदेशन. तज्ज्ञांमार्फत आहार व जीवनशैली विषयी विशेष मार्गदर्शन.

कार्यक्रमा दरम्यान तज्ज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बदलती जीवनशैली आणि मानसिक ताणतणावामुळे तरुणींमध्ये पीसीओडीचे प्रमाण वाढत आहे. योग्य वेळी निदान आणि उपचार झाल्यास या समस्येवर मात करणे शक्य आहे.

उद्घाटनानंतर क्लिनिकमध्ये आलेल्या रुग्णांची प्रत्यक्ष तपासणी करून त्यांना आवश्यक औषधोपचार व समुपदेशनही करण्यात आले. जिल्हा रुग्णालय ठाणे येथील या सुविधेचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील अवैध व्यवसायांना आळा घाला- भाजपची नवनियुक्त पोलीस अधिक्षकांकडे मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शी आणि लोकाभिमुख पध्दतीने राखली जाईल तसेच विविध व्यवसायांना आळा बसेल, अशी अपेक्षा भारतीय जनता पार्टीने नवनियुक्त जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्याकडे केली आहे.

अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, चंद्रपूर हा सर्वधर्मसमभाव जपणारा आणि विविध सण- उत्सव एकोप्याने साजरे करणारा जिल्हा आहे. मात्र, गेल्या काही काळात काही अनुचित घटनांमुळे या शाततेला गालबोट लागल्याचे दिसून आले आहे. अशा परिस्थितीत कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शांतता समित्यांचे पुनर्गठन करणे अत्यंत आवश्यक आहे.

तसेच गेल्या काही वर्षात जिल्ह्यात अमली पदार्थाची तस्करी व अवैध विक्री चिंताजनकरित्या वाढली आहे. विशेषत: तरुण पिढीला लक्ष्य करुन हे जाळे सक्रीय असल्याचे दिसून येते. यामुळे समाजस्वास्थ्य धोक्यात आले असून, अनेक कुटुंबे उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. या संपूर्ण साखळीचा शोध घेऊन त्यामागील सूत्रधार, संबंधित घटक आणि संरक्षण देणाऱ्या व्यक्तींवर कठोर व निष्पक्ष कारवाई करुन हे ' सिंडीकेट' पूर्णत: उध्वस्त करणेयात यावे, अशी अपेक्षाही भाजपकडून करण्यात आली.

जिल्ह्यात कोळसा चोरीचे प्रकार सातत्याने वाढत असून, राष्ट्रीय संपत्तीची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे. काही ठिकाणी शासकीय अधिकारी, पोलीस अधिकाऱ्यांच्या संगनमतातून या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याची जनमानसात भावना आहे. कोळसा माफिया, कोल वॉशरी माफिया आणि संबंधित साखळीवर कठोर कारवाई करुन विशेष तपास पथके स्थापन करावीत व या प्रकारांना आळा घालण्यासाठी तांत्रिक व गुप्तचर यंत्रणा अधिक सक्षम करावी. जिल्ह्यात वाढते रस्ते अपघातांमुळे अनेक निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागत आहे. मद्यप्राशन करुन वाहन चालविणे, जड वाहनांवरील सुरक्षाविषयक त्रुटी, रेडेयम पट्ट्यांचा अभाव, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि विनापरवाना वाहनचालक ही यामागील प्रमुख कारणे आहेत. अचानक तपासणी मोहीम, कठोर दंडात्मक कारवाई, जनजागृती अभियान आणि नियमित वाहतूक नियंत्रण यंत्रणा अधिक सक्षम करुन अपघातांचे प्रमाण शुन्यावर आणण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

ग्रामीण व शहरी भागात अवैध गावठी दारुविक्री तसेच परवानाधारक दुकानांमध्ये नियमबाह्य विक्री व मद्यसेवनाचे प्रकार सुरु असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. बिअर शॉपीमध्ये देशी दारुविक्री व मद्यप्राशन या पृष्ठभूमीवर पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागाची संयुक्तबैठक घेऊन संयुक्त तपासणी मोहिम राबवावी व दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच जिल्ह्यात रेती चोरी व अवैध उत्खननाचे प्रकार उघडपणे सुरु आहेत. यामुळे पर्यावरणीय हानीसह कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत आहेत.

या प्रकारामागील माफिया साखळीवर कठोर गुन्हे दाखल करुन संघटित गुन्हेगारी रोखण्यासाठी विशेष कारवाई करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीष शर्मा, महापौर संगीता खांडेकर, नगरसेवक राहुल पावडे, राजेंद्र गांधी आदींनी दिले.

## आदिवासी समाजाच्या विकासासाठी कायम अग्रेसर - आ.मुनगंटीवार

### आदिवासी सभागृहाचे काम तात्काळ सुरू करण्याची दिली ग्वाही



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** देशाच्या प्रगतीमध्ये आदिवासी समाजाचे मोठे योगदान आहे. आदिवासी विद्यार्थ्यांनी एव्हरेस्ट सर करून झेंडा गाडला. आदिवासींमध्ये एकलव्याची क्षमता असल्याचे सिद्ध केले. त्यामुळे आदिवासींच्या सेवेचा कुठलाही विषय असला तरीही मी तातडीने मदत करत असतो. आदिवासी समाजाच्या विकासासाठी मी कायम अग्रेसर असतो, असा विश्वास राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

देवाळा (मोहुर्ली), ता.भद्रावती, जि.चंद्रपूर येथील गोंडवाना गोटूल पेनठाणा देवाळा यांच्या स्थापनेला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित गोंडी नृत्य सांस्कृतिक स्पर्धा २०२६ कार्यक्रमाला आ. मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यावेळी ते बोलत होते.या कार्यक्रमाला माजी जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, आदिवासी समाजाचे नेते शुभम गेडाम, भाजपा नेते रामपाल सिंह, परमेश्वर मडावी, डॉ.साची बंग, प्रभाकर कोरवते, संतोष पेन्दोर, सुनिता कातकर, बिरेंद्र सिंग ठाकूर, मनीष सिद्धू यांच्यासह आदिवासी भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

अनवाणी पायांनी आदिवासी भगिनी स्वागतासाठी आल्याबद्दल आ. मुनगंटीवार यांनी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी देवाळा गावासाठी सुसज्ज रुग्णवाहिका देण्याची घोषणा आ. मुनगंटीवार यांनी केली. तसेच मंजूर २० लक्ष रुपयांच्या आदिवासी सभागृहाचे काम लवकरात लवकर सुरू होईल, असे आ. मुनगंटीवार यांनी यावेळी आश्वस्त केले.

यावेळी बोलताना आ. मुनगंटीवार म्हणाले, या दुर्गम भागातील एखादी व्यक्ती अचानक आजारी पडल्यास तिला प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत वेळेत पोहोचविणे ही मोठी समस्या ठरते. योग्य वेळी उपचार मिळाले तर अनेकांचे प्राण वाचू शकतात. तसेच जंगल परिसर असल्यामुळे वन्यप्राण्यांच्या हल्ल्याच्या घटना ही घडतात. अशा वेळी जखमी व्यक्तीला तातडीने चंद्रपूरसारख्या मोठ्या रुग्णालयात हलविण्यासाठी सक्षम व्यवस्था आवश्यक आहे. गावात वाहतुकीची साधने मर्यादित आहेत. बसेस उपलब्ध असल्या तरी आपत्कालीन परिस्थितीत त्या पुरेशा ठरत नाहीत. त्यामुळे या गावासाठी पुढील काही दिवसांत सुसज्ज रुग्णवाहिका देण्याची घोषणा मी करीत आहे.

आ. मुनगंटीवार म्हणाले, गावाच्या विकासासाठी रस्ते, सभागृह, रुग्णवाहिका अशा सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. मात्र केवळ पायाभूत सुविधा निर्माण करून चालणार नाही, तर आदिवासी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेही तितकेच आवश्यक आहे. तरुणांच्या हाताला काम मिळाले, त्यांना स्वावलंबी बनण्याची संधी मिळाली, तरच खऱ्या अर्थाने समाजाचा विकास होईल.

मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळत असताना आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा प्रयत्न केला. आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, त्यांच्यातील क्षमता मोठ्या व्यासपीठावर यावी. यासाठी नामांकित व दर्जेदार शाळांमध्ये प्रवेशाचा मार्ग मोकळा करण्यात आला. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना ही मोठी स्वप्ने पाहण्याचा अधिकार आहे. या भावनेतून हे पाऊल उचलण्यात आले. तसेच तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या बांधवांचे उत्पन्न वाढावे आणि त्यांच्या श्रमाला योग्य न्याय मिळावा.

यासाठी तेंदूपत्त्याच्या बोनसामध्ये वाढ करण्यात आली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्रपणे ५ टक्के निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णयही महत्त्वपूर्ण ठरला. या निधीतून अनेक विकासकामांना गती मिळाली आणि दुर्गम भागांमध्ये मूलभूत सुविधांची उभारणी करण्यास मदत झाली.

# वाकोला-धोबीघाट मासळी बाजारात मासे कापण्यास BMC ची बंदी

## कोळी महिलांमध्ये संताप चिकन कापण्यास परवानगी, मग माशांवरच बंदी का? - कोळी समाजाचा सवाल

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, मुंबई :** मुंबई महानगरपालिकेने (BMC) वाकोला व धोबीघाट परिसरातील मासळी बाजारात मासे कापून किंवा साफ करून विकण्यास मनाई केल्याने कोळी समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. मासे कापल्यामुळे दुर्गंधी व अस्वच्छता पसरते असे कारण पालिकेने दिले आहे.

**नेमके काय घडले?**

०३ मे २०२६ रोजी इचउ च्या स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांनी धोबीघाट, वाकोला येथील कोळी महिलांना सूचना दिल्या की, यापुढे ग्राहकांना फक्त अख्खे, न कापलेले मासे विकावेत. मासे कापलेले आढळल्यास परवाना रद्द करण्यासह कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

**कोळी समाजाच्या प्रमुख आक्षेप :**

१. भेदभावाचा आरोप : कोळी महिलांचे म्हणणे आहे की, शहरभरात कोंबड्या व मटण कापण्याची शेकडो दुकाने परवानगीने चालतात. स्वच्छतेचा मुद्दा असेल तर सर्वांसाठी समान नियम लागू करावेत. फक्त कोळी समाजाला लक्ष्य करणे अन्यायकारक आहे.

२. उपजीविकेवर परिणाम : ग्राहक प्रामुख्याने साफ केलेले मासे खरेदी करतात. मासे कापून न दिल्यास विक्रीवर मोठा परिणाम होऊन अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात येईल, अशी भीती कोळी महिलांनी व्यक्त केली.

३. घटनात्मक हक्काचा मुद्दा : हा निर्णय संविधानाच्या कलम १९(१) (स) अंतर्गत मिळालेल्या उपजीविकेच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारा असल्याचे मत समाजातील नेत्यांनी मांडले.

**कोळी महिलांची भूमिका :**

हा आमचा पिढ्यानपिढ्यांचा पारंपरिक व्यवसाय आहे. स्वच्छता राखण्यासाठी पालिकेने नियम व सुविधा द्याव्यात, आम्ही त्याचे पालन करू. मात्र, सरसकट मासे कापण्यासच बंदी घालणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया एका कोळी विक्रेत्या महिलेने दिली.

**प्रशासनाची बाजू :**

याबाबत BMC कडून अद्याप अधिकृत पत्रक जारी करण्यात आलेले नाही. मात्र, स्थानिक अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, नागरिकांच्या तक्रारींनंतर सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

**पुढील वाटचाल :**

कोळी समाजाच्या प्रतिनिधींनी या निर्णयाविरोधात पालिका आयुक्तांची भेट घेण्याचे ठरवले आहे. स्वच्छतेचे नियम पाळून मासे कापण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी करण्यात येणार आहे.

# नमुंमपा आरोग्य विभागामार्फत टीबी मुक्त भारत १०० दिवसांची विशेष मोहीम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, नवी मुंबई :** जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने दिनांक २४ मार्च २०२६ पासून टीबी मुक्त भारत या राष्ट्रीय उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी १०० दिवसांची विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. क्षयरोग निर्मूलनासाठी गती देण्याकरीता टीबी मुक्त भारत अभियान मोहिम राबविण्यात येत असून या अभियानाचा उद्देश लपून असलेले टीबी रुग्ण शोधून लवकरात लवकर उपचारावर आणून टीबी मृत्यू कमी करणे तसेच समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करणे हा आहे.

या १०० दिवसांच्या अभियाना दरम्यान ६० वर्षावरील नागरिक, मधुमेह असलेले, क्षयरुग्णांचे सहवासित, क्षयरोगाचे उपचार घेतेलेले रुग्ण, १८.५ पेक्षा इचख कमी असलेले व्यक्ती इ. जोखमीच्या गटांमध्ये क्षयरोगाचा धोका जास्त असल्याने अभियान अंतर्गत छातीचा एक्सरेद्वारे तपासणी करण्यात येत आहे.

सदर सेवा देण्याकरीता कार्यक्षेत्रात आयुष्मान आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये इतर आरोग्य सेवा जसे की मधुमेह तपासणी, उच्च रक्तदाब तपासणी, कुष्ठरोग तपासणी इ., करण्यात येते तसेच संशयित रुग्णांची मोफत तपासणी व त्वरित निदान, टीबी रुग्णांना नियमित औषधोपचार व पोषण सहाय्य (निक्षय पोषण योजना), शाळा, महाविद्यालये व समुदाय पातळीवर जनजागृती कार्यक्रम, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक व आरोग्य संस्थांशी समन्वय वाढविणे इ. महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

नमुंमपा कार्यक्षेत्रात दि. २४ मार्च २०२६ पासून एकूण ७९ आयुष्मान आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले




असून त्यामध्ये एकूण ७९०१ लाभार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेतला आहे.

क्षयरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. मात्र, वेळेत निदान व उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला, वजन घटणे, ताप येणे, रात्री घाम येणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी.या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नमुंमपा आयुक्तांमार्फत करण्यात येत आहे. टीबी मुक्त भारत हे आपले सामूहिक ध्येय असून, प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. चला, आपण सर्वजण मिळून टीबी विरुद्ध लढा देऊया आणि भारताला टीबीमुक्त बनवूया.

# मातोश्रींच्या ग्रंथतुलेतून वाचन संस्कृतीचा अनोखा संदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील मांडवे खुर्द येथील मांडवे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे पदवीधर शिक्षक बाळासाहेब खराबी यांनी आपल्या सेवानिवृत्ती निमित्त मातोश्रींची ग्रंथतुला करून सुमारे ३५ हजार रुपयांची पुस्तके शाळेस भेट देत एक प्रेरणादायी आदर्श घालून दिला.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या कुसुमाग्रज वाचन अभियानाला चालना देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांचा वाढता स्क्रीन टाइम कमी करून वाचनाची आवड निर्माण व्हावी, या हेतूने खराबी यांनी हा स्तुत्य प्रयत्न केला.

विशेष म्हणजे, वयाच्या ८६ व्या वर्षीही मातोश्री भिकुबाई झुंगाजी खराबी यांनी वाचनाची आवड जोपासली आहे. त्यांच्या प्रेरणेतून कार्यक्रमात उपस्थित प्रत्येक मान्यवरांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र भेट देण्यात आले.

सेवानिवृत्तीचा सोहळा कोणत्याही मंगल कार्यालयात न करता शाळेतच घेण्याचा निर्णय घेत, विद्यार्थ्यांसमोर आई-वडिलांच्या सेवेतून आदर्श निर्माण केल्याबद्दल शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे यांनी खराबी यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेलापूर महाविद्यालयाच्या प्राचार्या व ज्येष्ठ कवयित्री डॉ.गुंफाताई कोकाटे या होत्या. विद्यार्थी हेच दैवत मानून केलेली सेवा शिक्षकाला खरे समाधान देते, असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक डॉ.बाळासाहेब शिंगोटे यांनी केले. सूत्रसंचालन संदीप गाडे यांनी तर आभार प्रदर्शन बाबाजी ढोकळे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी आप्तेष्ट, ग्रामस्थ, शिक्षक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने



## मांडवे खुर्द शाळेला ३५ हजारांची पुस्तक भेट

उपस्थित होता. विस्तार अधिकारी कांतिलाल ढवळे, केंद्रप्रमुख काशिनाथ आंधळे, सरपंच कमलताई गागरे, उपसरपंच मनिषाताई जाधव, रावसाहेब रोहकले, रामचंद्र झावरे, सोन्याबापू बर्वे, ॲड. बाबा खिलारी, डॉ.प्रदिप दाते, जयश्री उदावंत, मोहन रोकडे, अमोल उगले, प्रवीण ठुबे, कारभारी बाबर, सूर्यकांत काळे, संदीप ठाणगे, संभाजी औटी, मनोहर लांडगे, पत्रकार बबन गायखे रवींद्र पायमोडे, संजय शिंदे, भगवान वाळुंज, विलास साठे, तारकराम झावरे, विनायक जाधव, श्रीरंग गागरे, देवराम जाधव, जगदीश गागरे, संतोष बागुल, तुकाराम जाधव, सुनील दुधाडे, सतीश रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी मंगल झावरे, शैलजा पायमोडे, लता शिंदे, प्रीतम बर्वे, यशवंत जाधव, सोमनाथ आहेर, कैलास गागरे, मंगेश गागरे, योगेश आहेर, प्रल्हाद भालेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संतुलित खत वापर जागरूकता अभियान - २०२६

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि ०६, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विद्यापीठातील संशोधनाचा फायदा शेवटच्या घटकापर्यंत झाला पाहिजे. आगामी काळामध्ये शेतीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यामध्ये संतुलित खतांचा वापर महत्त्वाचा असून त्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्यापीठ संतुलित खत वापर जागरूकता अभियान - २०२६ राबवत आहे. विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवण्यासाठी शास्त्रज्ञांनी नाविन्यपूर्ण विस्तार पद्धतीचा वापर करावा असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे यांनी केले. धुळे येथील शासकीय कृषी महाविद्यालयाला भेटी प्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. विलास खर्चे बोलत होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.बी.एम.इल्हे, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, मुक्ताईनगर, जि.जळगाव येथील कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.संदीप पाटील, पशु विज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.राहुल देसले, कृषी अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. विश्वनाथ शिंदे व कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.दिनेश नांद्रे उपस्थित होते.

याप्रसंगी कुलगुरू डॉ.विलास खर्चे मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की हवामान अनुकूल शेती, नैसर्गिक शेतीचा प्रसार आणि एकात्मिक शेती पद्धतीवर आपण भर द्यायला हवा. ग्रामीण युवकांना शेतीकडे वळवण्यासाठी कृषी उद्योजकता विकास,




शेतकरी उत्पादक कंपन्यांना तांत्रिक पाठबळ आणि फुले समृद्धी गाव संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी संतुलित खत वापर जागरूकता अभियान - २०२६ या भितीपत्रिकेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ.विलास खर्चे यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण शैक्षणिक, संशोधन तसेच विस्तार कार्याचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी महाविद्यालयाच्या विविध विभागात भेटी देऊन मार्गदर्शन केले. महाविद्यालयाबरोबरच बाजरी संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र येथे भेट देऊन तेथील आढावा त्यांनी घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.बी.एम.इल्हे यांनी प्रास्ताविक करून महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा आढावा सादर केला. डॉ. राहुल देसले यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक बाबींचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.जगदिश काथपुरी यांनी केले तर आभार डॉ.विकास पवार यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्रकल्प समन्वयक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# थोडक्यात

## श्री.शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाची बारावीच्या निकालामध्ये नेत्रदीपक कामगिरी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, बुलडाणा :** श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री. शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय चिखलीचा १२ वी मार्च २०२६ या परीक्षेमध्ये कला व विज्ञान दोन्हीही शाखांचा निकाल १०० टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही कनिष्ठ महाविद्यालयाने आपली १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. एच.एस.सी मार्च २०२६ परीक्षेसाठी विज्ञान शाखेचे ७९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के मिळाला आहे. विज्ञान शाखेमधून चि.गजानन भागवत शिंदे याने ८६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. चि.युवराज किशोर लष्कर याने ८४.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. कु. सिफा चांद शेख हिने ८३.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच कला शाखेमधून कु. नेहा रामेश्वर जाधव या विद्यार्थिनीने ८१ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. कु.हर्षदा किशोर सोळंके हिने ७६.८३ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक तसेच कु.अश्विनी रामदास जाधव हिने ७४.८६ टक्के गुण मिळवून कनिष्ठ महाविद्यालयातून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाचे एकूण ४३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम श्रेणीमध्ये ५७ विद्यार्थ्यांनी स्थान मिळवले आहे .तर द्वितीय श्रेणीमध्ये १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय चिखलीच्या या बारावी परीक्षेतील उज्वल यशाबद्दल श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष ॲड.गजाननरावपुंडकर, भैय्यासाहेब पुसदेकर, केशवरावजी मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपभाऊ इंगोले सर्व कार्यकारिणी सदस्य, शाळा समिती सदस्य, शाळा तपासणी अधिकारी प्रकाशराव अंधारे,उद्धवरावविखे, प्राचार्य डॉ.अनंतकुमार चेके, उपप्राचार्य गजेंद्रसिंह राजपूत पर्यवेक्षक जयेश सावजी, कनिष्ठ महाविद्यालयीन विभागप्रमुख प्रकाश हुसे, शिक्षक प्रतिनिधी गजानन वायाळ तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## देशाच्या विकासासाठी जनगणना महत्त्वाची; परभणी जिल्ह्यातील मुस्लिम समाजाने पुढे यावे

### जनगणनेत सक्रिय सहभाग घ्यावा - मौलाना जलील यांचे आवाहन



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०६, परभणी :** देशभरात ०१ मे २०२६ पासून सुरू होणाऱ्या जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजाने जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन जमीयत उलेमा मराठवाडा उपअध्यक्ष मौलाना अब्दुल जलील यांनी केले आहे. देशभरात मौलाना मेहमूद मदनी यांच्या मार्गदर्शनाखाली तर महाराष्ट्रात नदीम सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम समाजामध्ये जनगणना जनजागृती अभियान सुरू करण्यात आले आहे. मुस्लिम समाजाला जनगणनेचे महत्व पटवून देण्याचे काम यावेळी करण्यात येत आहे. जनगणना केवळ लोकसंख्येची मोजणी नसून देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असल्याचे त्यांनी नमूद केले. शासनाच्या विविध योजना, सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यांसाठी योग्य नियोजन करण्यासाठी जनगणनेतील माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते, असेही त्यांनी स्पष्ट केले. मौलाना अब्दुल जलील यांनी सांगितले की, प्रत्येक नागरिकाने जनगणना अधिकाऱ्यांना अचूक आणि सत्य माहिती द्यावी. नाव, वय, शिक्षण, व्यवसाय, कुटुंबातील सदस्यांची माहिती याबाबत कोणतीही चुकीची माहिती देऊ नये. चुकीची माहिती दिल्यास भविष्यात शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. तसेच, जनगणना प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, त्यांच्याशी नम्रतेने वागावे आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती योग्य प्रकारे द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. कोणत्याही अफवा किंवा गैरसमजांना बळी न पडता शांततेने आणि समजूतदारपणे ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे त्यांनी समाजाला सांगितले.मौलाना अब्दुल जलील यांनी पुढे म्हटले की, जनगणना ही देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे आणि प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग नोंदवणे गरजेचे आहे. मुस्लिम समाजानेही या प्रक्रियेत पुढाकार घेऊन देशाच्या विकासात आपला वाटा उचलावा, असे त्यांनी नमूद केले. या आवाहनामुळे मराठवाडा भागात जनगणना प्रक्रियेबाबत जनजागृती होण्यास मदत होणार असून, समाजात सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

## इन्व्हिटेशनल स्केटिंग स्पर्धेत अधीर जुन्नावारचा प्रथम क्रमांक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** जमहाराष्ट्र दिनाच्या औचित्याने इंडियन स्केटिंग अकॅडमी यांच्या वतीने, तसेच नागपूर महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या भव्य इन्व्हिटेशनल स्केटिंग स्पर्धेला खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमी नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. स्पर्धास्थळी मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांची उपस्थिती होती. लहानग्या खेळाडूंच्या जोशपूर्ण कामगिरीने आणि वेगवान स्केटिंगने संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण आणि रोमांचक झाले होते. या स्पर्धेत विविध वयोगटातील स्पर्धकांनी सहभाग घेत आपले कौशल्य दाखविले. विशेषतः ० ते ६ वयोगटात अधीर जुन्नावार याने अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावत गोल्ड मेडल मिळविले. त्याच्या वेग, संतुलन आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. चंद्रपूर शहरात अद्याप अत्याधुनिक स्केटिंग ग्राउंडची सुविधा उपलब्ध नसतानाही येथील खेळाडू मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मोठ्या स्पर्धांमध्ये आपली छाप पाडत आहेत, हे अधीरच्या यशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. मर्यादित साधनसामग्री असूनही चंद्रपूरमधील खेळाडू कोणत्याही बाबतीत कमी नाहीत, हे या स्पर्धेने सिद्ध करून दाखविले. या स्पर्धेमुळे लहान वयातच क्रीडाप्रती आवड निर्माण होत असून, खेळाडूंना योग्य व्यासपीठ मिळत आहे. पालकांनीही आपल्या मुलांच्या सहभागाला मोठ्या उत्साहाने प्रोत्साहन दिले. अधीर जुन्नावारच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, प्रशिक्षक विनोद निखाडे पालक आणि उपस्थित मान्यवरांनी त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.